ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २२२ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०८ कार्तिक शके १९४८, शुक्रवार दि.३० ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

खाजगी फायनान्स कंपन्यांचा फास आणि शेतकरी संकट

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

खासगी मायक्रो फायनान्स कंपन्या आणि सावकारी पाशामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे होणारे शोषण आणि त्यामुळे ओढवणारी आत्महत्येची वेळ ही अत्यंत गंभीर व हृदयद्रावक समस्या आहे. नुकतीच नांदेडमध्ये घडलेली शेतकरी चंद्रकांत शिंदे यांची घटना या क्रूर वास्तवाचे दाहक उदाहरण आहे, जिथे अवघ्या १०,०० रुपयांच्या कर्जासाठी एका शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागला. नांदेडमध्ये शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या आत्महत्येचे प्रकरण वर आले असतानाच आता परत एकदा जिल्हा लातूर येथील शिरूर तालुक्यातील अंकुलगा राणी येथे दत्ता सूर्यकांत कुंभार या युवकाने खाजगी क फायनान्सच्या कर्जास कंटाळून आत्महत्या केली.

नांदेड येथील चंद्रकांत शिंदे यांनी खासगी फायनान्स कंपनीकडून (खालसा फायनान्स / केएफ एंटरप्रायझेस) साधारण ७,००० ते १०,००० रुपयांचे कर्ज घेतले होते।

मुद्दल आणि व्याजाची रक्कम वाढवून ती ७०,००० रुपये मागितली जात असल्याचा आरोप आहे.पैसे न भरल्याने फायनान्स कंपनीच्या लोकांनी त्यांना गावातून उचलून आणून कार्यालयात डांबून ठेवले आणि मारहाण केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला . त्यानंतर त्यांचा मृतदेह त्याच कार्यालयात गळफास घेतलेल्या स्थितीत आढळला.

हा आत्महत्येचा नसून घातपात (हत्या करून फासावर लटकावल्याचा) आरोप मयताच्या आईने व नातेवाईकांनी केला आहे. जोपर्यंत संबंधित फायनान्स चालकांवर कठोर गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे.पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा आहे.

बँकांकडून किंवा अधिकृत संस्थांकडून कर्ज न मिळाल्यामुळे शेतकरी नाइलाजास्तव अशा खासगी किंवा मायक्रो फायनान्स कंपन्यांकडे वळतात.हे लोक १० ते २० टक्क्यांपर्यंत किंवा त्याहून अधिक दराने व्याज आकारून काही डांबून ठेवण्यासारखे प्रकार घडतात.यामुळे शेतकरी प्रचंड मानसिक तणावाखाली येतात.

१० हजारांच्या कर्जासाठी ३०% पेक्षा जास्त व्याज आणि प्रक्रिया शुल्क कापून कमी रक्कम हातात दिली जाते, जी नंतर चक्रवाढ पद्धतीने काही पटींनी वाढवली जाते. शेतीचे उत्पन्न सहा महिन्यांनी येते, मात्र या कंपन्या दर आठवड्याला किंवा दिवसाला हप्ता मागतात. हप्ता चुकल्यास अव्वाच्या सव्वा दंड लावला जातो.

वसुली एजंट थेट शेतकऱ्याच्या दारात जाऊन गोंधळ घालतात, घरातील साहित्य जप्त करण्याची धमकी देतात किंवा बचत गटातील इतर महिलांसमोर अपमानित करतात, ज्यामुळे शेतकरी मानसिकदृष्ट्या खचतो आणि आत्महत्या सारखे पाऊल उचलतात.

महाराष्ट्रात निसर्गाच्या लहरीपणा, अवकाळी पाऊस, दुष्काळ यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात आहेत. अशातच खासगी सावकार व फायनान्स कंपन्यांच्या मुसक्या आवळल्या जात असल्याने शेतकरी हतबल होऊन टोकाचे पाऊल उचलत आहेत.

सरकारने दुष्काळग्रस्त भागात शेतकऱ्यांच्या घरी जाऊन कर्जवसुली न करण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही, या कंपन्या बेकायदेशीरपणे सक्तीची वसुली सुरू ठेवतात.

मराठवाडा आणि विदर्भ भागात केवळ २०२६ च्या सुरुवातीच्या काही महिन्यांतच शेकडो शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आपले जीवन संपवले आहे. या समस्येची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य सरकारने आता अशा छळ करणाऱ्या वित्तीय संस्थांच्या केवळ स्थानिक वसुली एजंट्सवरच नव्हे, तर थेट फायनान्स कंपन्यांच्या संचालकांवर (कडक कायदेशीर कारवाई व गुन्हे दाखल करण्याचे संकेत दिले आहेत. मात्र कारवाई कागदावरच होत आहे.

आंतरराष्ट्रीय कला संवादातून भारतीय कला परंपरेचा जागर

इटली, स्पेन देशांतील ३ कलावंतांची नाट्यशास्त्र विभागाला सदिच्छा भेट

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागासाठी २८ ऑक्टोबर २०२६ हा दिवस आनंदाचा, अभिमानाचा आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाण-घेवाणीसाठी अवस्मिरणीय ठरला. इटली आणि स्पेन या दोन देशांतील तीन कलावंतांनी एकाच दिवशी विभागाला भेट दिल्याने विभागाच्या कलात्मक व सांस्कृतिक वाटचालीत एक नवा अध्याय जोडला गेला.

इटलीच्या प्रसिद्ध भरतनाट्यम नृत्यांगना लुक्रेझिया मॅनस्किोटी यांनी विभागातील विद्यार्थ्यांसाठी भरतनाट्यम या भारतीय शास्त्रीय नृत्यशैलीवर एकदिवसीय कार्यशाळा घेतली. भारतीय नृत्यपरंपरेचा सखोल अभ्यास, नृत्याची शस्ति, भावाभव्यिक्ती, मुद्राभिनय आणि अंगसंचालन यांचा अनुभव विद्यार्थ्यांना या कार्यशाळेतून घेता आला. भारतीय संस्कृती आणि नृत्य परंपरेविषयी आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेली आस्था या कार्यशाळेतून अधोरेखित झाली.



याच दिवशी स्पेनमधील माद्रिद येथे गेल्या वीस वर्षांपासून गायक आणि संगीत नाट्य कलाकार म्हणून कार्यरत असलेले कॅलिएंटे फर्नांडिस यांनीही विभागाला भेट दिली. स्पेनमधील विविध नाट्यप्रयोग आणि चित्रपटांमध्ये काम करण्याचा समृद्ध अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. भारतातील हा त्यांचा पहिलाच दौरा होता. या भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत संगीत, नाटक, अभिनय आणि सांस्कृतिक कला वष्किारांविषयी आपले अनुभव व्यक्त केले. भारतीय नृत्य शैलीतील काही हालचाली करून पाहत त्यांनी भारतीय कला परंपरेविषयी विशेष उत्सुकता आणि आदरही व्यक्त केला.

विभागातील शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम, कला शिक्षणाची व्याप्ती आणि उपलब्ध सुविधा यांची माहिती घेतल्यानंतर फर्नांडिस यांनी विभागाच्या कार्याचे कौतुक केले. भारत आणि आशिया खंडातील या विभागाच्या व्यापकतेविषयी माहिती मिळाल्यानंतर त्यांनी आश्चर्य व आनंद व्यक्त केला.

कलेला भाषा, प्रदेश आणि देश यांच्या सीमा नसतात, तर ती माणसांना जोडणारी वैश्विक भाषा असते, याचा प्रत्यय या भेटीतून आला. परदेशी कलावंतांशी झालेल्या संवादामुळे विद्यार्थ्यांच्या कलादृष्टीला नवे क्षितिज लाभले असून, विविध देशांच्या कला परंपरा समजून घेण्याची आणि त्यातून सर्जनशील प्रेरणा घेण्याची संधी त्यांना मिळाली.जागतिक कलाविश्वाशी नाते जोडताना भारतीय सांस्कृतिक वारशाची समृद्धी जपणारा प्रादर्शिक कला विभाग इटली आणि स्पेनमधील कलावंतांच्या एकाच दिवशी झालेल्या भेटीने विभागाच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संवादाच्या वाटचालीला नवी ऊर्जा दिली आहे. हा दिवस विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कला प्रेमींसाठी निश्चितच अभिमानाचा व संस्मरणीय ठरला. कलेचा संगम, संस्कृतींचा संवाद आणि सर्जनशीलतेचा उत्सव यातूनच जागतिक कलामैत्रीचे नवे पर्व आकाराला येते. कार्यक्रमासाठी विभागातील सर्व प्राध्यापक वृंद आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुटुंबसंस्था

ज्योतिर्मय साहित्य

कुटुंबसंस्था समाजरचनेचा मूळ गाभा आहे. अनेक कुटुंबामिळून गाव, वस्ती, शहरे वसतात. त्यानुसार इतर सुविधा निर्माण होतात. आधुनिकीकरणामुळे शहरांची संख्या तद्वतच लोकसंख्याही वाढली. खेड्यातील संस्कृती शहरात हळूहळू लोप पावत चालली. शिक्षणाची विवीध दालने खुली झाली. शिक्षण हा केंद्रबिंदू मानून बहुतांशी लोकांनी शहराकडे धाव घेतली. आपली मुले उच्चविद्याविभूषित व्हावी, भरपूर पैसा कमवावा या उद्देशाने शहरे गजबजू लागली. शिक्षण घेणे, उच्चविद्याविभूषित होणे, परदेशात जाणे ह्या सर्व गोष्टी अभिमानास्पद आहेतच. पण या सर्व गोष्टीला संस्कृतीची जोड हवी हे मात्र काही जण विसरले. खेड्यात राहणारे मायबाप, आजी आजोबा यांना भावनिक ओलावा देण्याकरिता नविन पिढी जवळ नाही. त्यातून अनेक अनर्थ, दुष्परिणाम दिसत आहेत.

जुन्या काळी एकत्र कुटुंबपद्धती होती. रक्ताच्या नात्याचे सर्व एकत्र गुण्यागोविंदाने नांदायचे. घरातील कर्ता पुरूष हा कुटुंबप्रमुख असायचा. त्याची आज्ञा सर्वांना शिरसावंद्य होती. घरातील कामे मिळून केली जायची. लहान मुलांना आजी आजोबांचे



संस्कार मिळायचे. आजी आजोबांचं नातवंडावर अपार प्रेम असायच.तद्वतच नातवांनाही आजी आजोबा खुप आवडायचे. विशेषतः आजींने सांगितलेल्या कथा आजही आठवतात. आई, बाबा, काका, काकू, आत्या, आजी, आजोबा या सर्वांकडून प्रेम मिळायचं. घरात एकीचे नातेवाईक आले तर आपलाच पाव्हणा समजून त्याची बडदास्त ठेवायचे.एकीचा मुलगा आजारी पडला तर सर्व कुटूंब त्यासाठी धाव घ्यायचं. एकत्र कुटुंबातील ही रक्ताच्या नात्याची गुंफलेली जणू मोत्यांची माळचं होती.

एकत्र कुटूंबात एखादी सून वेगळ्या विचारांची आली आणि घरात क्लेश सुरू झाले. धन, संपत्ती, शेती, घर यांची वाटणी होऊ लागली. आणि




विभक्त कुटुंबाकडे वाटचाल सुरू झाली. मग एका घरची स्थिती पाहून शेजारच्या घरीही तोच प्रकार व्हायचा. हळूहळू एखाद दोन अपवाद सोडता संपूर्ण गावात विभक्त कुटुंब पद्धती निर्माण झाली. शेतीचे घराचे तुकडे झाले. पण प्रेम मात्र त्यांच्यात कायम होतं. एक दुस-याची विचारपूस करून हव नको ते देण्याची सर्वांची तयारी असे. आई बाबा, आजी आजोबांची जबाबदारी कुणा एका मुलाकडे सोपविल्या जाई.त्यासाठी त्याला जमिनीचा जास्त भाग दिल्या जायचा, एकंदरीत या विभक्त कुटुंब पद्धतीत प्रेम, विश्वास, आपुलकी, ममता कायम होती.

आज अती आधुनिकीकरणाचा काळ आहे. कुटूंब विभक्त झालेले आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी सर्वांची शहराकडे धाव आहे. मुलांना शिकवून डॉक्टर किवा इंजिनिअर बनवायचे हा ध्यास पालकाना लागलेला आहे. म्हातारे आईवडील गावात आणि मुलगा सून शहरात असे चित्र निर्माण झाले आहे. मुले शिकून परदेशात गेले तर त्यांचेही आईवडील एकटे राहतात. पोटाची भूक, आजारपण या सर्व समस्यांनी म्हातारपण ग्रासलेलं.रक्ताच्या नात्यापेक्षा पैसा मोठा झाला आहे.

मोठमोठ्या शहरात मुले नोकरी करत आहेत.वर्षातून आठ दिवसासाठी गावी येतात.पुन्हा ते आपल्या सुखात गर्क. पैसा एवढा महत्वाचा झाला आहे का? पैसाच सर्वकाही आहे का? मग कुटूंबाचे काय? कुटुंब म्हणजे केवळ पती पत्नी व मुले एवढी संकुचित कुटुंबाची व्याख्या करतात. गरजा भागवण्यासाठी पैशाची गरज आहे. तो कुटुंबात राहून कमवू शकत नाही का?कुटुंब म्हणजे घरातील सर्व सदस्य.आई, बाबा, आजी, आजोबा

पती, पत्नी, मुलं, इतर सदस्य मिळून कुटुंब बनते. ही प्रगल्भित व्याख्या पुन्हा आपल्या मनात ठसली पाहिजेत.

विभक्त कुटुंबाच्या पुढचा प्रकार वृद्धाश्रम. मुले शहरात, किंवा परदेशात राहतात.आणि आई वडिलांना वृद्धाश्रमात ठेवतात.ज्या मुलांच्या मायेसाठी, एक झलक पाहण्यासाठी ते म्हातारे जीव कासाविस होतात त्यांच्या भावनेचं काय?वृद्धाश्रमात सगळ काही मिळतं पण ते मुलाचं प्रेम कुठून आणणार? ही काय अवस्था झाली आपल्या कुटुंबसंस्थेची.म्हातारे आईवडील जन्मभर मुलांना शुभाशिर्वाद देत राहतात. पण त्यांच्या अंत्य वेळीही मुले नसणे याहून दुर्भाग्य कोणते?ही कुटुंबव्यवस्था मोडकळीस येण्याची नांदी समजावी का? मनुने कुटुंबव्यवस्था निर्माण करून समाज रचना केली.त्याला तडा तर जाणार नाही ना. आजच्या सुशिक्षीत तरूणाईने या प्रश्नाचा गांभिर्याने विचार करायला हवा. या सर्व गोष्टींना काही अपवादही आहेत.



ध्रुपदाच्या स्वरांनी नाट्यशास्त्र विभागात रंगला सुरेल शास्त्रीय संगीत आविष्कार

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने ध्रुपदगायन शैली आणि शास्त्रीय गायन या विषयावर गुरुवारी, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता आयोजित या कार्यशाळेत भारतीय शास्त्रीय संगीताच्या समृद्ध परंपरेचा सुरेल अनुभव उपस्थितांनी घेतला.

मध्य प्रदेशातील भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद व शास्त्रीय गायिका प्रा. सुरेखा कांबळे यांनी कार्यशाळेत ध्रुपद गायन शैलीचे स्वरूप, वैशिष्ट्ये, गायनातील तांत्रिक बारकावे, स्वरशुद्धता, लयबद्धता आणि शास्त्रीय संगीताच्या



साधनेविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले. भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेतील प्राचीन आणि समृद्ध अशा ध्रुपद गायनशैलीचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

सुरुवात विद्या धनेधर यांच्या स्वागत गीताने झाली. विभागप्रमुख डॉ. वैशाली बोदिले यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेमागील भूमिका आणि उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर ध्रुपद गायनाच्या सादरीकरणातून भारतीय शास्त्रीय संगीताची अनुभूती उपस्थितांना मिळाली.

या कार्यशाळेत सारंगी वादनासाठी हनिफ हुसैन, तानपुरा वादनासाठी मोनिका पटेल, तर पखवाज वादनासाठी गोपाल जाधव यांनी साथसंगत केली. सारंगी, तानपुरा आणि पखवाजच्या सुरेल साथसंगतीमुळे गायनाचा आविष्कार अधिक प्रभावी आणि श्रवणीय झाला. डॉ. स्मिता साबळे, डॉ. गजानन दांडगे, डॉ. गणेश शिंदे, डॉ. विशाखा शिरवाडकर, प्रा. संतोष गालफाडे, प्रदीप कांबळे, संजय सांगवीकर, रमेश धोंडगे, मुरलीधर भुताळे, सचिन शिंदे, राखी सलगर, स्मिता पांढरे, डॉ. रामदास ठोके, संदीप बुरसे, सुनील टाक यांच्यासह विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन नितीन ससाने यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. विशाखा शिरवाडकर यांनी केले.

परंपरा, साधनेसाठी उपयुक्त

भारतीय शास्त्रीय संगीताची परंपरा, साधना आणि गायनशैली यांचा अभ्यास करण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरली. संगीताच्या विद्यार्थ्यांना आणि अभ्यासकांना ध्रुपद गायनाच्या विविध पैलूंची माहिती मिळण्याबरोबरच प्रत्यक्ष सादरीकरणातून संगीताचा अनुभव घेण्याची संधी या कार्यशाळेच्या माध्यमातून उपलब्ध झाली.



जात्यावरच्या ओव्या.....

नाही पडलास पाण्या
अवघडल जगण
नाही चुकणार देणं
सोप वाटत मरण ||९१३||

नाही पडलास पाण्या
लेक शिकती शाळात
जाते येते अनवाणी
नाही चप्पल पायात||९१४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८४





ज्योतिर्मय साहित्य

श्रीशंकरांना रामनामाचा ध्यास लागलेला आहे. रामनाम म्हणजे जणू त्यांचा श्वास आहे. अशा पद्धतीचा ध्यास आपल्यालाही लागावा अशीच समर्थांची अपेक्षा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे महान तपसामर्थ्य अंगी असणारे भगवान शंकर जेव्हा सातत्याने रामनाम जपतात, तेव्हा आपण तर सामान्य माणसे ! या श्लोकात भगवान शंकरांबद्दल बोलताना समर्थ म्हणतात,''स्वये निवाला तापसी चंद्रमौळी.'' इथे निवाला शब्दाचे दोन अर्थ घेता येतात. पहिला अर्थ म्हणजे रामनामामुळे त्यांच्या जीवाला शांती लाभली. दुसरा अर्थ आपल्याला परिचित आहे. तो म्हणजे भगवान शंकरांनी जेव्हा हलाहल (विष) प्राशन केले तेव्हा त्यांच्या कंठाचा जो दाह होऊ लागला, तो कशानेही शमेना. त्यांनी मस्तकी गंगा धारण केली, गळ्याभोवती शीतल नाग धारण केला, शीतल असणारा चंद्र मस्तकी धारण केला. परंतु त्यांचा दाह केवळ रामनामानेच शांत झाला. या अर्थानेही निवाला हा शब्द वापरला आहे.

श्रीराम हे समर्थांचे आराध्य दैवत आहे. त्यांना नेहमी तो समोर दिसत असतो. म्हणून ते कधीही तो राम म्हणत नाही. तर हा राम असे म्हणतात. एवढी त्यांची रामाशी एकरूपता आहे. पांडुरंगाने ज्यांना मस्तकी धारण केले आहे असे श्रीशंकर सुद्धा रामानामाचा ध्यास घेतात, तेव्हा असे पावन, पवित्र असे रामनाम आपली देखील अंतकाळी या भवसागरातून सुटका करील असे समर्थांना सांगायचे आहे.

स्वसंवाद : १. पंढरीचा विठ्ठल आणि कैलासीचा राणा शिव यांच्यात जर कोणतेही द्वैत नाही, तर मी मात्र जाती-पाती, पंथ किंवा संप्रदायांच्या खोट्या भेदांमध्ये का अडकून पडलो आहे ?


२. संसारातील वेगवेगळ्या संकटांमुळे किंवा वासनांमुळे जेव्हा माझ्या मनाचा दाह होतो, तेव्हा मी तो शांत करण्यासाठी बाह्य गोष्टींकडे धावतो, की भगवान शंकरांप्रमाणे रामनामाचा आश्रय घेतो ?

३. समर्थांना प्रभू श्रीराम जसे हा राम म्हणून अगदी जवळ (अंतर्यामी) भासतात, तशी आत्मीयता आणि ओढ मला कधी नाम घेताना जाणवते का?

४. ''अंतकाळी हाच राम आपल्याला सोडवणार आहे'' हे अंतिम सत्य ठाऊक असूनही, मी माझा आजचा अमूल्य वेळ केवळ नश्वर गोष्टींची चिंता करण्यातच घालवत आहे का?

(क्रमशः)





श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचा अनुभव

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

***









श्रवण-फक्त क्रिया नाही

मित्रांनो आणि वाचकहो, मी आज "श्रवण" या तिन अक्षरी शब्दाबद्दल सांगतो. श्रवण या शब्दाचा अर्थ आहे, ऐकणे. सकाळपासून सूर्योदयापासून ते रात्री झोपेपर्यंत आपण ऐकत असतो. म्हणजे सकाळी झाडावरील पक्षाचा किलबिलाट, वेगवेगळे आवाज, सर्वत्र होणारे आवाज आपल्या कानावर येतात. आपल्या घरी दारी बाहेर रस्त्यावर,सार्वजनिक ठिकाणी मंदिरात आपण ऐकत असतो. एकमेकाशी बोलतो, प्रतिक्रिया देतो. घरात वडील, बहिणभाऊ यांचे ऐकतो. पण किती मन लावून? तसे ऐकून वागतो का? प्रयत्न करतो का? म्हणजे इथं मला हेच महत्त्वाचे सांगायचे आहे की, "श्रवण"करणे म्हणजे नुसती ऐकण्याची क्रिया नाही तर ते ऐकून त्यानुसार आपल्या वर्तनात, वागण्या आचरणात सुधारणा करून मग प्रतिक्रिया देतो का? म्हणजे ऐकून, श्रवण करून सोडणं नाही!म्हणून श्रवण प्रतिक्रियात्मक हवे. त्या श्रवणाने आपल्यात बदल व्हावा. जसे बसस्टॉपवर सूचना देऊन प्रवासी जशे वागतात. विद्यार्थी शिक्षक मॅडमचे नुसते ऐकत नाही तर कृती करतात, श्रवण फक्त अभ्यासासाठी हवे. गुरू, संतमहात्मा, अधिकारी व्यक्ती आपले विचार अनुभव कृती, पूमेये, कथा काव्ये सांगतो ते फक्त ऐकण्यासाठी नाही तर तुमच्यात बदल व्हायला हवा. त्याप्रमाणे वागणे कृती करणे पावले टाकून सुरूवात करणे ही श्रवणाची फलश्रुती आहे! महान तत्वज्ञ विचारवंत श्रेष्ठ यांचे ऐकूण बदल होत नसेल तर ? म्हणून श्रवणाने जीवनात संवाद वाढला पाहिजे, समानतेचा संदेश घराघरात, समाजात देशात
गेला तर त्याचा फायदा होतो. तेव्हा मित्रांनो फक्त श्रवण न करता त्याचा जीवनात ऊपयोग करा.आज एवढे पुरे. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे .सुप्रभात. आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



घराघरातील वाढता तणाव : वयात येणारी मुलं आणि चिडचिडी आई!

ज्योतिर्मय साहित्य

हार्मोन्समधील बदल, मानसिक ताण आणि नात्यांमधील दुरावा समजून घेऊया यामागचं वास्तव.

आजकाल अनेक घरांमध्ये एक चित्र पाहायला मिळते. वयात येणारी मुलं, त्यांच्यात होणारे बदल, वाढती चिडचिड, आई-वडिलांशी होणारे मतभेद आणि घरातील तणावपूर्ण वातावरण! कधी मुलं आईचं ऐकत नाहीत, तर कधी आई छोट्या छोट्या गोष्टींवरून रागावते. हळूहळू संवाद कमी होतो आणि प्रेमाच्या नात्यात गैरसमज वाढू लागतात.

पण या सगळ्यामागे नेमकं कारण काय असतं? मुलं बदलत असतात म्हणून आई चिडते, की आईच्या ताणाचा परिणाम मुलांवर होतो? की दोघांच्याही आयुष्यात घडणारे शारीरिक आणि मानसिक बदल याला कारणीभूत असतात?

या प्रश्नांची उत्तरं समजून घेणं आज प्रत्येक कुटुंबासाठी महत्त्वाचं आहे.

१. वयात येणारी मुलं : शरीरासोबत मनाचाही बदल!

किशोरावस्था हा मुलांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात शरीराची वाढ वेगाने होते. हार्मोन्समध्ये बदल होतात आणि मेंदूतील भावनांचे नियमन, निर्णयक्षमता आणि आत्मनियंत्रण यांचाही विकास सुरू असतो. त्यामुळे मुलांच्या वागण्यात काही बदल दिसू शकतात.

- छोट्या गोष्टींवरून राग येणे किंवा चिडचिड होणे.
- स्वतःचे मत मांडण्याची आणि स्वतंत्र निर्णय घेण्याची इच्छा वाढणे.
- आई-वडिलांच्या सूचनांचा विरोध करणे.
- स्वतःच्या दिसण्याविषयी, मित्रमैत्रिणींविषयी आणि भविष्याविषयी अधिक विचार करणे.
- कधी आनंदी, तर कधी उदास किंवा एकटे राहण्याची इच्छा होणे.

हे बदल किशोरावस्थेचा सामान्य भाग असू शकतात. मात्र, प्रत्येक मुलाची परिस्थिती वेगळी असते. सततची चिडचिड ही केवळ हार्मोन्समुळेच होते असे नाही. अभ्यासाचा ताण, अपुरी झोप, मित्रांमधील समस्या, सोशल मीडियाचा प्रभाव किंवा मनातील असुरक्षितताही यामागे असू शकते. म्हणूनच मुलांच्या वागण्यावर लगेच दोष ठेवण्यापेक्षा त्यांच्या मनात काय सुरू आहे, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

२. आईची चिडचिड : तिच्या मनातील न बोललेला थकवा!

- आई म्हणजे घराचा आधार. घरकाम, मुलांची काळजी, स्वयंपाक, कुटुंबाच्या गरजा, आर्थिक चिंता आणि अनेक जबाबदाऱ्या सांभाळताना ती अनेकदा स्वतःच्या गरजांकडे दुर्लक्ष करते.
- तिला थकवा येतो, मानसिक ताण जाणवतो, पुरेशी विश्रांती मिळत नाही; तरीही ती अनेकदा आपल्या भावना व्यक्त करत नाही.
- कधी याच ताणाचा परिणाम तिच्या बोलण्यात आणि वागण्यात दिसतो. छोट्या गोष्टींचा राग येतो, मुलांनी ऐकले नाही तर चिडचिड होते आणि नकळत घरातील वातावरण तणावपूर्ण बनते.
- काही महिलांमध्ये मासिक पाळीच्या आसपास किंवा रजोनिवृत्तीच्या काळात होणारे हार्मोनल बदलही मनःस्थिती आणि झोपेवर परिणाम करू शकतात. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

(क्रमशः)



प्रथम तुला पुजिते

श्री गणेशा,गजानना
प्रथम तुला पुजिते
तूच कर्ता,करविता
निरोगी जीवन खरे
सर्वांना तू द्दावे
आवडीचा छान देवता

सुंदर,सौज्वळ रुप
वेड लावते सर्वांना
मनोभावे करते सेवा
तुझे नाम ओठी
सुखकर्ता तू दुःखहर्ता
मुखी नामाचा मेवा

विश्वबंधुत्वाची शिकवण देणारे ''राष्ट्रसंत तुकडोजी महाराज''


ज्योतिर्मय साहित्य

आपल्या महाराष्ट्राला संतांची भूमि म्हणून ओळखले जाते. हिच महाराष्ट्राची भक्कम ओळख आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आपल्या महाराष्ट्रातील एक महान, थोर व प्रसिद्ध संत होते. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ साली अमरावती येथे झाला. तुकडोजी महाराजांचे मुळ नाव माणिक होते. तुकडोजी महाराजांचे गुरु अकडोजी महाराज हे होते. त्यांच्या गुरुकडून त्यांनी जीवनावश्यक सर्व धडे शिकले.

तुकडोजी महाराजांनी देशभर फिरून अध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले. बाहेर देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाची शिकवण दिली. बंधुत्व हे एक असे माध्यम आहे ज्याने आपण शत्रुवर मात करू शकतो. तुकडोजी महाराज म्हणतात की, ''आपला भारत देश खेड्यांचा देश आहे. आणि जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही''.

समाजातील सर्व स्तरातील लोकांचा उद्धार होणे गरजेचे आहे. तो कसा होईल? याविषयी चिंता होती त्यांना. ग्रामोन्नती व ग्राम कल्याण हा मनुष्य यशाचा केंद्रबिंदू आहे. म्हणूनच ग्राम कल्याण झाले की, आपोआप समाज सुधारणा होऊन समाजातील सर्व घटकातील, स्तरातील लोकांचे कल्याण होऊन विकास निश्चित आहे. हा सामाजिक उन्नतीचा विचार ते खुप कळवळीने सांगत होते.

त्याकाळी भारतातील खेड्यांची दयनीय अवस्था होती. म्हणूनच ग्राम विकासाच्या, ग्रामोन्नतीच्या विविध



प्रकारच्या समस्यांचा मूलभूत स्वरूपाचा त्यांनी खोलवर विचार केला. प्रत्येक समस्यावरील तोडगा व उपाय, निराकरण यावर उपयुक्त अशा उपाय योजना ही त्यांनी सुचविल्या होत्या. तुकडोजी महाराजांच्या जीवन कार्यातील अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे त्यांच्या जीवनाला पुर्णत्व प्रदान करून देणारे लेखन. तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धा निर्मूलन यावर प्रकाश टाकला. देवभोळेपणा, जुन्या चालीरिती, धर्म अंधश्रद्धा हे सर्व नष्ट व्हावे जेणेकरून माणसाचा ऱ्हास होणार नाही. समाजातील जाचक रुढिंना त्यांनी भजन व कीर्तन रूपी खतपाणी देऊन समूळ नष्ट केले. व समाजातील सर्व स्तरात एकमेकांबद्दल प्रेम, सहकार्य व बंधुत्वाची भावना रुजविण्यास सुरुवात केली.

आपल्या राष्ट्राचे खरे सौन्दर्य हे खेड्यामध्ये आहे. म्हणून जोपर्यंत खेड्यांचा उत्तम विकास साधला जाणार नाही तोपर्यंत राष्ट्राच्या विकासाचे तिळमात्र महत्व नाही. ग्राम हे सुसंस्कृत, नीटनेटके, सुनिश्चित, नियोजित, सुशिक्षित प्रत्येक गोष्टींमध्ये संपन्न व्हावे हिच खरी तळमळ होती. ग्रामोन्नतीचे खरे शस्त्र म्हणजे सर्वधर्मसमभाव. सर्व समुदाय एकत्र येऊन सर्वधर्म समभाव बाळगावा ही तुकडोजी महाराजांची निर्मळ प्रार्थना होती. तुकडोजी महाराज आपल्या खंजिरी भजनातून स्वतःला अभिप्रेत असलेल्या विवेकी विचारसरणीचा प्रचार व प्रसार करून अध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले.

जोपर्यंत महिलांची पुरेपूर उन्नती होणार नाही तोपर्यंत राष्ट्राची उन्नती होणार नाही. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था व राष्ट्रव्यवस्था ही सर्व स्त्री उद्धारावर कशी अवलंबून आहेत. हे त्यांनी भजन व कीर्तनातून पटवून सांगितले. केवळ चुलमूल म्हणत स्त्रीला अंधारात न ठेवता तीला पुढे आणा. तेव्हाच खऱ्या अर्थाने राष्ट्रहित साधल्या जाईल. समाजपयोगी आणि राष्ट्रहीत साधणाऱ्या अशा महत्वपूर्ण गोष्टींवर संत तुकडोजी महाराजांनी आवाज उठवला आणि समाजाला उन्नतीचा, नवं प्रेरणेचा प्रेरणादायी विचार सांगितला.





नव्या पिढीमध्ये मराठीविषयी अभिमान निर्माण करण्याची गरज-प्रा. परदेशी

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा विशेष व्याख्यान

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीमध्ये भाषेविषयी अभिमान निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. दौलतसिंग परदेशी यांनी येथे केले. सोयगावमधील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात मराठी विभागातर्फे अभिजात मराठी भाषा सप्ताह-२०२६ अंतर्गत अभिजात मराठी भाषा : वर्तमान आणि भविष्य या विषयावर विशेष व्याख्यानात प्रमुख व्याख्याते म्हणून परदेशी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते.

प्रा. परदेशी यांनी मराठी भाषेची ऐतिहासिक परंपरा, तिचे वर्तमानातील स्थान आणि आधुनिक काळातील आव्हाने यांवर प्रकाश टाकून नव्या पिढीला मराठीचे महात्म्य समजून सांगणे आवश्यक असल्याचे सोदाहरण स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी मराठी भाषेचे सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. अभिजात भाषेचा दर्जा ही मराठी भाषेसाठी अभिमानाची बाब असून, तिच्या विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून वाचन, लेखन आणि साहित्य संवर्धनाची परंपरा समृद्ध करावी, असे आवाहन प्राचार्य पवार यांनी केले.

मराठीला समृद्ध वारसा

मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश औताडे यांनी प्रास्ताविकातून अभिजात मराठी भाषेचा समृद्ध वारसा, तिची साहित्यिक परंपरा आणि सांस्कृतिक महत्त्व विशद केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या संधींचा उल्लेख करून मराठी भाषेच्या संवर्धनासह प्रचार-प्रसारासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन डॉ. ज्योती स्वामी यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. शिवाजी सिरसाट यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आनंदवनभूवनी ग्रंथाचे शिवथरघळीत प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – ज्येष्ठ समर्थ भक्त आणि श्री सुंदर मठ शिवथरघळ येथील विश्वस्त डॉ. विजय लाड यांनी समर्थ रामदास स्वामींच्या आनंदवनभूवनी या काव्यावरील विवेचन पर ग्रंथ प्रसिद्ध कीर्तनकार सौ . रोहिणी परांजपे यांच्या हस्ते ग्रंथराज दासबोधाची गंगोत्री शिवथरघळ येथे काल झाले.

दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन परिवाराचा दरवर्षीप्रमाणे मागील ४१ वर्षांपासून शिवथरघळीत कोजागिरी पौर्णिमेपासून साधना सप्ताह चालू आहे. देशातल्या पाच राज्यांमधून आलेल्या जवळपास १५० पेक्षा जास्त साधकांच्या उपस्थितीत सौ. रोहिणी परांजपे यांचे वेणास्वामी यांच्या जीवनावरील अत्यंत सुश्राव्य आणि प्रबोधनपर कीर्तन झाले. यावेळी



आनंदवनभूवनी या ग्रंथाचे प्रकाशन सौ. रोहिणी परांजपे यांचे हस्ते झाले. प्रकाशन प्रसंगी सौ मेधा कुलकर्णी, अपर्णा वांगीकर, श्री कौस्तुभ परांजपे, नीला अभ्यंकर, सौ. विद्याताई लव्हेकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. शुभदा थिटे, संतोष सप्रे, बाळासाहेब पाटील, सौ. सुचेता देशपांडे, सौ. विनया विद्वांस, सौ. शुभांगी समुद्र यांनी परिश्रम घेतले.











हा खेळ विधात्याचा ! (अनाकलनीय)

ज्योतिर्मय साहित्य

देव, कोणाला काय गिफ्ट देईल सांगता येत नाही.

एखाद्या माणसाला तो इतका गोड समंजस स्वभाव देतो की, नुसते त्या व्यक्तीचे नाव ऐकले की, लोकांना आधार वाटतो. ती व्यक्ती आर्थिक दृष्ट्या श्रीमंत असो की नसो, पण एक विश्वसनीय आधार त्या व्यक्तीकडे इतका असतो की, चुंबकासारखे लोक त्या व्यक्ती कडे आपोआप आकर्षिले जातात.

एखाद्या माणसाकडे पाहून नेहमी तेच वाटते, की तो एकटा सर्व कसे सांभाळतो, खरंच कौतुक आहे.

भावंडे, आईवडील कुटुंब बायको, मूल नोकरी, समाज, नातीगोती कुटुंब सांभाळताना आपल्या बायको आणि मुलाला पुरेसा वेळ देणे, सर्वाना एकाच वेळी सांभाळणे, त्यात सदैव हसतमुख राहून योग्य रितीने परिस्थिती हाताळणे.

कधीही हसतमुख राहून स्वतःहून चौकशी करणार?

काळजी, सुखदुःख सर्वात सहभागी होणार, म्हणजे या कुटुंबातील एक भाग म्हणूनच, आपली जबाबदारी म्हणून वागणार अगदी सहजपणे.

बुद्धीमान, कलाकार, निगर्वी, माणुसकी जपणारा, सहज सर्वात मिसळून जाणारा.

देवाने असे व्यक्तिमत्व सर्वानाच दिले तर जगात कुठेच वादविवाद, भांडण, कुरापती, द्वेष, हेवादावा, तिरस्कार, असूया राहणार नाही.

अशी एक व्यक्ती आहे की, ती कधी न रागावता सहजपणे दुसर्यांच्या भावना, दुःख समजून घेते, स्वतः सहनशीलता ठेवून निर्मळ भावनेने दुसर्यांना मदत करते. स्वतः आनंदी राहून सर्वाना आनंद वाटते.देवाने जगात अशा सद्वर्तनीच माणसाना जन्माला घातले तर जगात कुठेच अनाचार घडणार नाही.

सर्वच जणांनी आपली नाती माणुसकीने जपली तर कशाला जगात कोलाहल माजेल.

पण देव खूप हुशार आहे, चतुर आहे बरं का? तो अशाच माणसाची वारंवार परीक्षा घेत असतो, सतत त्याच्यामागे कोणत्याकोणत्या प्रकारचे शुक्लकाष्ट मागे लावून देतो.

सतत त्याला अग्निपरीक्षा द्यायला लावतो. त्याच्या वाटेत सतत काटे पेरलेले असतात, एकामागून एक दुःखाची मालिका लावून देतो, नियती त्याला खेळवत असते, सत्वपरीक्षा पहात असते, आयुष्य

संपेपर्यंत हीच वाताहत चालू असते. माणसाने सुखाची वाट पहात आयुष्यातल्या खाचाखळगे, कडेकपारी, अंधार कोठडीतून एखादा प्रकाशाचा किरण कुठेतरी शोधायचा असतो.

''खरं तर देव माणसाकडून काहीच मागत नसतो''.



तो फक्त निर्मिती करत असतो आणि मानव संधीचा फायदा घेत असतो, कधी स्वतःच संकटाचे खड्डे स्वतःच खोदत असतो.

त्यावेळी असे वाटते, ही सृष्टी कोणत्या कारणात्सव निर्माण झाली हा तर सारा विधात्याचा खेळ आहे, न संपणारी वादळे, संकटे, ताणतणाव. आपण न मागता माणसाचा जन्म मिळतो, जगण्याचे सुख, समाधान, आनंद, शांतता तर मिळतच नाही. आणि नको असलेले रहाटगाडगे विनाकारण खेचत राहतो, त्यात अर्धी मडकी फुटतात, केलेले कष्ट वाहून जातात. ज्यांना आयुष्य हवे आहे त्यांना सुखाने जगता येत नाही, ज्यांना आयुष्य नको आहे त्यांना यातना, वेदना भोगत जगावे लागत आहे, काय आहे विधात्याचा खेळ?

जन्म मृत्यू जर त्याच्याच हातात असतो, निर्मिती जर त्याच्या हातातच आहे तर प्रत्येक शिल्प तो सुंदर, सत्शील, सद्वर्तनी का घडवत नाही. आणि कर्मफळ नावाचे एक फळ त्याच्या झोळीत टाकून मृत्यू पर्यंत त्याला ती झोळी घेऊन दारोदर भटकावे लागते. कोणत्याही हव्या, नको असलेल्या प्रसंगाना तोंड द्यावे लागते. मग त्याच्या हातून बरीवाईट कृत्ये घडतात, नाईलाजाने कधी परिस्थितीशी अगतिक होऊन, मग मिळालेले सुंदर आयुष्य शिक्षा म्हणून भोगावे लागते. हा झाला विधात्याचा खेळ, आपण फक्त त्यातल्या सोंगट्या आहोत, इथे, तिथे फेकल्या जाणार्या. इतकी वर्ष विचार करुन मानवजन्माचे कोडेच उलगडत नाही, हा सारा आभास आहे, तरी तो प्रत्येक सजीवाला भोगावा लागतोय, कधी सुखाचे, आनंदाचे क्षण येतात, पण तो आनंद फार काळ टिकत नाही, लगेच दुःखाचे सावट पसरत असते. जन्माचा आनंद आणि मृत्यूचे भय घेऊनच माणूस सतत जगत असतो. मग कधी परिस्थिती प्रमाणे त्याच्या हातून प्रमाद घडतात, आणि ते कर्मभोग म्हणून माथी मारले जाते.

मृत्यूला वयाची मर्यादा नसते. अगदी भृणावस्थेपासून ते ११० पर्यंत कोणत्याही वेळी तो हजर असतो. आणि म्हणे मृत्यूनंतरही यातना असतातच, मग जन्ममृत्यूचा फेरा तरी कशासाठी? सारेच अनाकलनीय आहे? पृथ्वी तरी एकच का असावी?

जेवढे सजीव तेवढ्या पृथ्वी निर्माण झाल्या तर, सर्व पृथ्वीवर सद्वर्तनी, सर्वगुणसंपन्न जीव निर्माण झाले तर. तर कुठेच विनाश होणार नाही!

***

क्रांतीची मुळाक्षरे:-सम्यक विचारधारेची मर्मग्राही कविता


ज्योतिर्मय साहित्य

कवीस्नेही सन्मित्र प्रशांतकुमार जी रंगरेषांच्या तरलं आत्मानुभूती एक सृजनशील चित्रकार कवी.अंतरंगातून सजग जाणिवाची प्रखर माणुसकीच्या गहिवरांची कविता देवून जातो.या देशात मायभूमीत अजूनही जात पात धर्म पताका घेऊन ही माणसं हैवान,सैतान झाली आहेत.

त्यांच्या मनमस्तिष्कांत अजून जात आहे.जी मनुची

कैदाशीन आहे.ती जात नाही. नितीमूल्यांची चाड त्यांना राहिली नाही.युगानुयुयाची गुलामी व लाचारी इथेल्या गाभाडलेल्या व्यवस्थेने दीन,दलित वंचितांना गावं वेशीबाहेर ठेवलं.पण या विश्वाचा प्रकांड पंडीत, प्रज्ञासूर्य

महामानव एक क्रांतीसूर्य उगवला व उध्दारली कोटी कुळे भीमा तुमच्या जन्मामुळे.हा युगानुयुगाचा अंधार दुर झाला.तेंव्हापासून क्रांतीची मुळाक्षरे आम्ही तना मनात निर्धारने कोरुन घेतली.आज ज्या गाव हडवाई शेजारी गावाकुसाबाहेर,खळवाडीचा आता भीमनगर मोहल्ला झाला.भीम अक्षर निळाई घेऊन आम्ही लेकरं आज उच्चविद्याविभूषित होऊन नव्या अस्मितेने उजळून निघालो.हातात धारदार निर्धाराची आंबेडकरी अस्मितेची मुळाक्षरे घेऊन.हेच साक्षेपी विचाराचं मर्मग्राही वास्तव मांडणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून विद्रोही शब्दांगार देऊन जाते. म्हणूनआंबेडकरी विचारांचे धारदार निर्धारक कवी प्रा.प्रशांतकुमार डोंगरदिवे यांच्या क्रांतीची मुळाक्षरे या कवितेचा मर्मग्राही आस्वादक अनुबंध म्हणजे तथागत भगवान बुद्धांच्या त्रिशरण पंचशीलांच्या मध्यम सम्यक संबुध्दांच्या विचारांची बांधिलकी घेऊन येणारी ही कविता आहे.तथागत भगवान गौतम



बुद्धांनी सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाने ज्या निर्मिकांनी माणसंकीचा धम्म सांगितला पंचशील त्रिशरणाचा अंगीकार करावा.हा


धम्मपथ आहे.अक्षरझरणी व नीबेतून पिंपळपर्णी व प्रज्ञासूर्यांचे शितळ नितळ सूर्यबिंब.कवी रंगरेखाकार प्रशांतकुमार यांचे मुखपृष्ठ आशय संपन्नतेचा सृजनशील



जातीनिहाय आरक्षणची शिदोरी आठवते.

आज सर्वहारा वंचित समाजबांधव शहराशी निगडित आहे.आम्ही स्वयं प्रकाशित झालो आहोत.पण आमचे आरक्षण ही त्यांची पोटशूळ आहे.कवी आपल्या सये ला

ही सम्यक दृष्टींच्या प्रकाशमान स्त्रीयांची यशोगाथा सांगतो आहे.मुक्ता साळवे,ताराबाई शिंदे,फातीमा शेख,व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या विचारांची ही परिवर्तनाची सजग सकाळ होऊन तू आली पाहिजेस.हा



क्रांतीची मुळाक्षरे मनस्वी आविष्कार आहे.कवीची कविता ही जातीचं सरण रचतो ते असं की,''रचले सरण हिचे अन् लावला भडाग्री/सरणातही जळेना ही जात माणसाची''(पृ.१५) आजही ही जात माणसाची तीओंजळभर आरक्षण मागते व जाती जातीच्याचं लवकंडी लावून देतं आहे.इथे खरे भारतीय प्रजासत्ताक संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन

निर्धाराचा विचार ही कविता देते.तर सुरुवात अशी,

''घेऊन धम्मदीक्षा होऊनीया प्रबुद्ध/ शोषणाचे जुलमी जोखड फेकून देत आहे/ आता कुठे भीमा सुरुवात फक्त झाली/हे विश्व गौतमाच्या पायाशी झुकत आहे''(पृ.१७)ही कविता अत्यंत निस्सीम ध्येयपूर्तीची आहे. **(क्रमशः)**


समकालीन कवितेचा मर्मग्रही अनुबंध

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

स्त्रीमनाच्या अलवार, सूक्ष्म आणि तितक्याच प्रखर वास्तववादी अनुभवांचे विश्लेषण संजीवनी तडेगावकर यांच्या संदर्भासहित, श्रीनिवास म्हस्के यांच्या बाईचा दस्तऐवज, अरविंदा भामरे यांच्या शापित कोलाहलाच्या नोंदी आणि प्रतिभा खैरनार यांच्या वंशावळीच्या प्राचीन सरीतून या कवितासंग्रहांच्या माध्यमातून समोर येते. बाईपणाचे दुःख केवळ दुःखाच्या पातळीवर न राहता, ती कशी या शोषक व्यवस्थेविरुद्ध धारदार निर्धार करते, तिचे मातृत्व, तिची सोशिकपणाची पराकाष्ठा आणि तिचा स्व-अस्तित्वाचा लढा कसा समृद्ध होत जातो, याचे प्रत्ययकारी विश्लेषण लेखकाने केले आहे.

शेती आणि शेतकरी यांच्या आजच्या दुर्दशेचा पंचनामा करणाऱ्या कवितांचा आस्वाद घेताना समीक्षकाची लेखणी अधिकच पोळलेली आणि धारदार झालेली दिसते. प्रा. डॉ. माधव जाधव यांचा राबणारे हात रिकामे, सागर जाधव जोपुळकर यांचा माती मागते पेनकिलर, धनाजी घोरपडे यांचा जामिनावर सुटलेला काळा घोडा, नारायण खरात यांचा हे ही दिवस जातील आणि अशोक कचरू गायकवाड यांचा जीव रानात गहाण या संग्रहांच्या समीक्षेतून आजच्या कृषी संस्कृतीचे विदारक चित्र उभे राहते. यंत्रयुगात हरवत चाललेली मातीची ओल, रासायनिक खतांचा अतिवापर, हतबल झालेला पोशिंदा आणि दलालांच्या विळख्यात अडकलेली शेती या सर्वांचा टाहो लेखकाने अतिशय ताकदीने टिपला आहे.



अविनाश पोईनकर यांच्या दंडकारण्य आणि डॉ. सखाराम डाखोरे यांच्या हुलबिगूल या संग्रहांद्वारे आदिवासींच्या अलक्षित, शोषित आणि मुख्य प्रवाहापासून तुटलेल्या आदिम विश्वाचा आक्रोश लेखकाने वाचकांपर्यंत पोहोचवला आहे. जल, जंगल आणि जमिनीच्या लढ्यात आदिवासींचे होणारे विस्थापन, कॉर्पोरेट जगाचे आक्रमण आणि संविधानाने दिलेल्या हक्कांची होणारी गळचेपी यावर अत्यंत थेट भाष्य या समीक्षेतून आढळते.

याशिवाय कैलास भाले यांचा अस्वस्थ, सुनील दा. उबाळे यांचा उलट्या कडीचं घर, अजीम नवाज राही यांचा वळीवाच्या वेळा, किरण भावसार यांचा घामाचे संदर्भ, हबीब भंडारे यांचा मृत्यूच्या अनिश्चित सावटाखाली, स्वप्नील मेश्राम यांचा फितूर दिवसांचे संदर्भ, जयदिप विघ्ने यांचा भवर भिंगरी आणि डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांचा बारूद या कवितासंग्रहांचा रसास्वाद घेताना समीक्षकाने समकालीन वास्तवातील अस्वस्थता, कामगार विश्वाचा संघर्ष, तरुणाईचे प्रश्न, डिजिटल युगातील तुटलेपण आणि मानवी संबंधांतील गुंतागुंत या सर्वांना स्पर्श केला आहे.

डॉ. प्रभाकर शेळके यांची भाषाशैली अत्यंत प्रवाही, आस्वादक, सोपी पण आशयघन आहे. कवितेतील प्रतिमा, प्रतीके आणि शब्दकळांचा मागोवा घेताना त्यांची रसग्रहण क्षमता वाखाणण्याजोगी वाटते. समीक्षकाने कुठेही क्लिष्ट किंवा बोजड भाषेचा वापर न करता, सामान्य वाचकालाही कवितेच्या जवळ घेऊन जाणारी सुलभता जपली आहे.



समकालीन कवितेचा मर्मग्राही अनुबंध हा समीक्षाग्रंथ समकालीन मराठी साहित्यात, समीक्षा च्या प्रांगणात अत्यंत मोलाची भर घालणारा ठरतो. हा ग्रंथ केवळ समीक्षा करत नाही, तर समकालीन समाजमन, राजकीय उलथापालथ, सांस्कृतिक संघर्ष आणि मानवी मूल्यांची पडझड यांचा एक सचित्र आरसा वाचकांपुढे उभा करतो. मराठी साहित्याचे अभ्यासक, संशोधक, रसिक वाचक आणि कवी यांच्यासाठी हा समीक्षाग्रंथ मार्गदर्शक, चिंतनशील आणि नितांत संग्राह्य असाच आहे.

समीक्षाग्रंथ: समकालीन कवितेचा मर्मग्रही अनुबंध
लेखक: डॉ. प्रभाकर शेळके
प्रकाशक: ठसा प्रकाशन गृह
पृष्ठे: १२२; किंमत: २५० रुपये

कुटुंबप्रमुख हवा आहे!
भाग १७ : मना चंदनाचे परी त्वां झिजावे

ज्योतिर्मय साहित्य

''आजोबा, मला वाटते, तुम्ही आम्हाला आईला विचारायला सांगितले, कारण ती दिवसरात्र सर्वांची किती काळजी घेते,'' श्रीराम म्हणाला.

''हो, श्रीराम! तू अगदी बरोबर विचार करतोस. तुला माहीत आहे का, आईच्या या कृतीतून समर्थ रामदास स्वामींच्या पुढील श्लोकाचा अर्थ प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो,'' आजोबा म्हणाले.

''कुठला श्लोक, आजोबा?'' श्रीरामने विचारले.

आजोबा म्हणाले,

देहे त्यागितां कीर्ति मागे उरावी।
मना सज्जना
हेचि क्रिया धरावी।।
मना चंदनाचे
परी त्वां झिजावे।
परी अंतरी
सज्जना
निववावे।।८।।

''चंदन स्वतः झिजून दुसऱ्यांना सुगंध देते.

त्याप्रमाणे माणसानेही केवळ स्वतःच्या सुखाचा विचार न करता इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. मात्र, याचा अर्थ स्वतःचे आरोग्य किंवा अस्तित्व धोक्यात घालणे नव्हे. आपल्या क्षमतेनुसार कुटुंबासाठी आणि समाजासाठी योगदान देणे महत्त्वाचे आहे.

''आई-वडील मुलांसाठी कष्ट घेतात, आजी-आजोबा नातवंडांना वेळ देतात आणि भावंडे एकमेकांना मदत करतात. यातून प्रेम, कृतज्ञता आणि सहकार्य यांचे संस्कार होतात. प्रत्येकाने केवळ आपल्याला काय मिळते, याचा विचार न करता आपण इतरांना काय देऊ शकतो, याचाही विचार करावा.''

''आजोबा, हे तर समाजविज्ञान आहे!'' श्रीराम म्हणाला.


''अगदी बरोबर! त्या अर्थाने रामदास स्वामींना समाजजीवनाचे जाणकारही म्हणता येईल,'' आजोबा म्हणाले.

''पण आजोबा, तुम्ही यापूर्वी रामदास स्वामी मानसशास्त्राचे जाणकार होते, असेही सांगितले होते!'' श्रीरामने आठवण करून दिली.

''समाजशास्त्र आणि मानसशास्त्र ही परस्परांशी निगडित असलेली सामाजिक शास्त्रे आहेत. रामदास स्वामींचे विचार मानवी मनाबरोबरच समाजजीवनालाही मार्गदर्शन करतात. त्यांचा दासबोध हा ग्रंथही खूप सुंदर आहे. तू मोठा झाल्यावर तो जरूर वाच,'' आजोबा म्हणाले.

''आजोबा, आई घर सांभाळते, स्वयंपाक करते, कोणी आजारी पडले तर त्याची काळजी घेते आणि तुमचीही किती काळजी घेते! किती कामे करते ती!'' श्रीराम म्हणाला.

पमेला हसून म्हणाली, ''घरातील सगळ्यांची काळजी घेण्यातच दिवस कसा निघून जातो, ते कळतही नाही. मुलांचा अभ्यास, घरातील कामे, कोणाची तब्येत बरी नसेल तर त्याची काळजीया सगळ्यांत स्वतः साठी वेळ काढणेही कठीण होते. आपल्या काही परंपरा आणि धार्मिक गोष्टी करायच्या राहून जातात, हेही कधी कधी जाणवते.''



''पमेला, तुम्ही इथे कधी सत्यनारायणाची पूजा केली आहे का?'' आजोबांनी विचारले.

''नाही, मामा. खरं तर कधी सुचलंच नाही. कदाचित इथल्या वातावरणाचा परिणाम असेल. करायला हवी होती,'' पमेला थोडी अपराधी भावनेने म्हणाली.

''अगं, मी सहज विचारलं. तू इतकं वाईट वाटून घेऊ नकोस. घरच्यांसाठी झटताना स्वतःच्या आवडी-निवडी आणि परंपरांकडे दुर्लक्ष होऊ शकतं,'' आजोबा समजावून म्हणाले.

''नाही, आता तुम्ही म्हणत असाल तर नक्की करूया. पुरोहित शोधावे लागतील,'' पमेला म्हणाली.

''हल्ली सगळीकडे सगळं मिळतं, पमे!'' आजोबा म्हणाले.

''आजोबा, तुम्ही आईला एकदम 'पमे' असे का म्हणालात?'' श्रीरामने आश्चर्याने विचारले.

''अरे, माझे मामा मला लहानपणी प्रेमाने 'पमे' अशीच हाक मारायचे,'' पमेला हसून म्हणाली.

''मामा, मी कृष्णकांतशी आजच बोलते. दसरा जवळ आलाच आहे. त्याच दिवशी सत्यनारायणाची पूजा करूया,'' पमेला म्हणाली.

''वा! छानच! शुभस्य शीघ्रम्!'' आजोबा आनंदाने म्हणाले.


क्रमशः भाग १८ : सत्यनारायणाची पूजा

निसर्ग वाचला तरच अन्नधान्य मिळेल! अन्नधान्य मिळाले तरच सर्वसृष्टी वाचेल!

मधुकर निलेगावकर, पुणे ९४२१३७५६९१

पुढे.....

तसेच निसर्गातच जर पाणी शिल्लक राहिले नाही तर तुम्ही कुठून पाणी विकत घेणार! ही गोष्ट वैयक्तिक नाही तर सार्वजनिक आहे. जगातील सर्वांनाच पिण्यासाठी पाणी लागत असते.तसेच, पाणी जगातील कोणताही देश आयात करु शकत नाही.वर्षागणीक पृथ्वीचे तापमान वाढत आहे. दहा वर्षापूर्वी तापमान ३५ डिग्री होते. पाच वर्षापूर्वी ते ४० डीग्री झाले. सन २०२५ मध्ये ते ४५ डिग्री झाले. अशीच तापमानवाढ होत राहिली तर आता ते सर्वत्र २०२७-२८मध्ये ते ५० डिग्री होण्याचे किंवा त्यापेक्षा जास्त तापमावाढ होण्याचे नाकारता येत नाही. कारण,वरचेवर परिस्थिती तशीच निर्माण होत आहे. तसे जर झाले तर मानवसृष्टी व सजीवसृष्टी व निसर्गसृष्टी अस्तित्वात राहील का नाही हे सांगता येत नाही.धरणात जर भेगा पडल्या तर धरणातील पाणी जमिनीत झिरपत जाते. तसेच, अन्य ठिकाणी सुध्दा हे पाणी वाहात जाते. त्यामुळे, धरणातील पाणीसाठा कमी कमी होत जातो. याला दूसरेही एक कारण आहे. मुख्य म्हणजे ते खूप महत्त्वाचे आहे. आपल्या देशातील तसेच, जगभरातील तज्ज्ञ शास्त्रज्ञांनी संशोधनाअंती हे सिध्द केले आहे की, पृथ्वीचे तापमान दरवर्षी वाढत असल्याने तसेच, ते ४७ ते ४८ अंशांच्याही पूढे गेले आहे. ही महाराष्ट्रातील विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील तापमानाची सध्याच्या सन २०२६ मधील वस्तुस्थिती आहे. त्यामुळे, महाराष्ट्राच्या अनेक धरणांमधील पाण्याचे तीव्र स्वरूपाच्या उष्णतेमुळे बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे, धरणांमधील पाणीसाठा कमी कमी होत चालला आहे. अजून एक अत्यंत महत्वाचे कारण म्हणजे, पावसाळ्यात भरपूर प्रमाणात पाऊस पडल्यामुळे तसेच, अतिवृष्टी झाल्यामुळे दरवर्षी महाराष्ट्रातील बहुतांशी धरणे पुर्णपणे भरल्यानंतर धोक्याच्या पातळीवर जर पाणी गेले त्या धरणांमधील पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी दररोज हजारो, लाखों क्युसेक्स लिटर पाणी धरणातून आसपासच्या परिसरात, गावात सोडावे लागते. त्यामुळे, आसपासची खेडेगावे पाण्याच्या पूराने वेढली जातात. (क्रमश:)



मुलांसाठी बोधकथा

आर.पी. दुसे, 94 22202747

राजा काहीं मरत नाही ?

आत्मविश्वास असेल तर नकारात्मक विचार सकारात्मक होण्यास वेळ लागत नाही. समोरच्या व्यक्तीला पाहून आपण एखादे वेळी नकारात्मक विचाराने ग्रासून जाऊन त्या व्यक्तीचा तिरस्कार ही करतो पण त्याच वेळी ती व्यक्ती देखिल आपल्या बद्दल मनात तिरस्कार जोपासत असते. हे आपण मनातून विसरत असतो किंवा आपल्या लक्षात येत नसते , हेच आपल्या मनाचे खरे कार्य असते. पण त्याची सत्यता शोधण्यात खरा चागूंल पणा आहे. गैर समज म्हणतात तो ह्यातूनच उत्पन्न होवून विनैव संशयाचे जाळे निर्माण करीत असतो. आपल्या मनात एखादी व्यक्ती चांगली वाटली तर त्या व्यक्तीला देखिल आपल्या बद्दल चांगले आणि सकारात्मक विचार त्यांच्या मनात आल्याशिवाय रहात नाहीत . पण असे विचारांचे कारण मात्र व्यक्ती परत्वे वेगवेगळे असू शकते .

एकदा एका राजाची एका गावातून सवाद्य मिरवणूक निघाली होती. तेव्हा दूर वर एका ओट्यावर उभा राहून चिंतेने व्याकूळ चेहऱ्याने अंगावर फाटकी कपडे घालून एक गरीब व्यक्ती उभा असल्याचे राजा पहात होता. कित्तेक दिवस तो ती व्यक्ती मिरवणूक येण्याच्या वेळी त्याच स्थितीत उभा असलेला पहात होता . प्रथम राजाला त्याच्या बद्दल आश्चर्य वाटायचे पण कालांतराने त्याचे मन त्याचा द्वेश वाटू लागला कारण त्याच्या उद्देश काय असावा ह्या बद्दल राजाच्या मनात शंका निर्माण झाली.

त्याला मारहाण करून घालवून आवे किंवा त्याला मृत्यू दंड घ्यावा असेही राजाला वाटू लागत होते. वास्तविक ती व्यक्ती काही त्याचा शत्रू नव्हता पण त्याच्या बद्दल राजाच्या मनात अनेक नकारार्थी विचार प्रवाह मात्र चालू होता. तेव्हां त्यानी प्रधानाला आपले विचार सांगितले आणि असे का वाटते ह्याचे कारण काय? असा प्रश्न त्यांच्या समोर ठेवला. ह्या चे उत्तर शोधण्याची आज्ञा केली .

दुसरे दिवशी त्या व्यक्तीचा पत्ता शोधून स्वतः वेषांतर करून त्याच्या घरी जातो आणि आपले कसब वापरून त्याच्या बद्दल ; त्याच्या अडचणी बद्दल समस्येबद्दल संपूर्ण माहिती करून घेतो पण पहिल्या फेरीत प्रधान जीना तो काहीं खरे कळू देत नाही . एक दोन भेटी झाल्या नंतर ती व्यक्ती त्यांच्याशी मोकळे पणाने, दिलखुलास गप्पा मारते . अशा प्रकार प्रधानजी त्याच्याशी मैत्री करून आपल्या बद्दल त्याच्या मनात आत्मविश्वास निर्माण करून घेतो आणि एक दिवस गप्पा करत असताना त्याच्या अंतर्मनातील सत्य शोधण्यात यशस्वी होतो तेव्हां ती व्यक्ती त्याला अनाहूत पणे विचारते की प्रधानजी आपला राजा काही मरत नाही, आणि मी काही कर्जाच्या कचाट्यातून मुक्त होत नाही . हे विचित्र वाक्य ऐकून प्रधानजी गोंधळात पडला आणि त्यांनी त्याला विचारले की राजाच्या मरणाच्या आणि तुझ्या कर्ज मुक्त होण्याचा काय संबंध आहे ? (क्रमश:)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559